MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

## ३ वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करा

प्रतिनिधी । मुंबई

निवडणूक आयुक्तांचे आदेश

३ वर्षांपेक्षा जास्त ज्या अधिकाऱ्यांची सेवा झाली त्यांना तात्काळ बदला असे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत. पुढच्या दोन तीन दिवसांत बदल्या करा, असे आदेश दिले असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज निवडणूक आयोगाची महत्वाची पत्रकार परिषद आज पार पडली. यामध्ये निवडणुकीच्या संदर्भातील महत्वाची माहिती त्यांनी दिली.

निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुरुष मतदार हे ४. ९५ कोटी आहेत. तर स्त्री मतदार हे ४.६४ कोटी आहेत. तसेच दिव्यांग ६.३२ लाख आहेत. तर थर्ड जेंडर मतदार हे ५९९७ आहे. याचबरोबर पहिल्यांदा मतदान करणारे मतदार हे १९.४८ लाख आहेत. जो सभेसाठी मैदान मिळण्यासाठी अर्ज करेल त्याला मैदान देण्याची संधी दिली जाईल. अशी माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०२ अंक –१२ रविवार दि.२९ सप्टेंबर २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-02 Issue -12 SUNDAY DT.29 SEPTEMBER 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4



# मोहन दादा जगतापांच्या हाकेला साथ देत माजलगाव मतदार संघात गर्दीच गर्दी

- मोहन जगतापाचे शक्तिप्रदर्शन विधानसभेची शिक्कामोर्तब
- दादांनी हाक दिली जनतेने साथ दिली विधानसभेमध्ये दादांना पाठवायचे माजलगाव मध्ये इतिहास घडवायचा आहे जनतेतून सूर
- मोहन जगतापाचा धसका प्रकाश सोळंके,रमेश आडसकर यांनी घेतला.?
- माजलगाव मतदार संघामध्ये दलित मुस्लिम मराठा ओबीसींची साथ मोहन जगतापानाच.
- सर्वाधिक दलित मुस्लिम मतदार संघातील समाजबांधव मोहन जगताप यांच्या सभेला आवर्जून उपस्थित.

माजलगाव ।प्रतिनिधी

शून्यातून विश्व निर्माण करत माजी आमदार बाजीराव जगताप यांनी माजलगाव मतदार संघामध्ये एकाकाळी इतिहास रचला होता.त्याच इतिहासाची आता पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. छत्रपती साखर कारखान्याचे चेअरमन मोहन जगताप यांनी आज शक्ती प्रदर्शन करत माजलगाव मतदार संघातील जनतेला एक वेळा हाक दिली आहे. तर या जनतेने मोहन मोहन दादा जगताप यानी हाक दिली आम्ही साथ देणार असंही माजलगाव मतदार संघातील जनता बोलत आहे. माजलगाव मतदार संघामध्ये दलित मुस्लिम ,मराठा ,ओबीसी, या सर्व जाती धर्मातील लोकांची मन जपण्यामध्ये मोहन जगताप यांना यश या अगोदर सुद्धा यश आलेला आहे. मोहन जगताप हे सर्वसामान्य साठी अहोरात्र झटणारा नेता म्हणून ओळख असलेला एक साखर कारखान्याचा चेअरमन जरी असला तरी सर्वसामान्यांमध्ये मिसळून बसणारा व सर्वांच्या सुखदुःखामध्ये गाठीभेटी घेऊन प्रत्येक वेळी हजर राहणारा एकमेव माणूस आहे. अशी माजलगाव मतदार संघात चर्चा होत आहे प्रकाश सोळंकेला शह देण्यासाठी या ठिकाणी मोहन जगताप यांना साथ देण्याची गरज माजलगाव मतदार संघामध्ये असल्याचे चित्र आता आजच्या मोहन जगताप यांच्या शक्ती प्रदर्शनाच्या सभेने दिसून आलेला आहे. माजलगाव मतदार संघामध्ये मोहन जगताप यांच्यामुळे राजकीय वर्तुळामध्ये मोठा राडा होण्याची दाट शक्यता आहे. यामध्ये भाजपाला आता नेमका झटका बसणार का साथ मिळणार मोहन जगताप जर भाजपच्या बाहेर पडले तर कोणत्याही पक्षांमध्ये गेले किंवा अपक्ष जरी लढले तरी मोहन जगताप यांना माजलगाव मतदारसंघातील जनता आता आमदार करण्याच्या विचारात आहे. कारण मोहन जगताप हे कधीही कोणत्याही जातीपातीच्या राजकारणाला थारा मिळतात न देता विकास व सुखा दुखामध्ये स्वतः सात देत त्या ठिकाणी मोहन जगताप व त्यांचा छत्रपती परिवार सर्वांना साथ देत असतानाच आता या शक्ती मेळाव्यामुळे माझी मंत्री तथा माजलगावचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके व पुतणे जयसिंह सोळुंके व भाजपा नेते रमेश आडसकर यांचे आता धावे दणलेले आहेत. त्यामुळे मोहन जगताप यांना आता येणाऱ्या काळामध्ये नक्कीच साथ मिळणार आहे एवढी गोष्ट मात्र नक्की आहे.

मोहनदादा मित्र मंडळाच्या माध्यमातून अठरापगड जातीची ताकद मोहन जगताप यांच्या पाठीशी उभी.छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या अनेक शेतकरी ,ऊसतोड मजुरांच्या आशीर्वादाने मोहन जगताप माजलगाव ची विधानसभा जिंकणारच.इतर पक्षाची चाचपणी सुरू मात्र अपक्ष लढण्याची ही तयारी मोहन दादा जगताप यांची आहे कार्यकर्त्यांनी ठाम निर्णय घेतला दादांना निवडून आणायचं.शरद पवारांच्या राष्ट्रवादी मध्ये फूट पडली आणि अजित पवार बाहेर पडले मोहन जगताप यांना माजलगाव मतदार संघामध्ये दोन्ही पवारांच्या राष्ट्रवादीचे कार्यकर्ते साथ देणार.मोहन जगताप यांना भाजप कडून तिकीट जर दिले नाही तर त्या ठिकाणी भाजपला मोठी डोकेदुखी होणार.मोहन जगताप म्हणजे सर्वांच्या अडचणीच्या वेळी उभा राहणारा हक्काचा माणूस.



## येणाऱ्या निवडणुकीत मतदानाच्या माध्यमातून २०१९ चा तोच राजकीय दरारा निर्माण करा – मिलिंद घाडगे

परळी (प्रतिनिधी)

येणाऱ्या निवडणुकीत मतदानाच्या माध्यमातून वंचित बहुजन आघाडीचा २०१९ तोच दरारा निर्माण करा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केले.आज दिनांक २७/ ९/ २०२४ रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परळी मतदारसंघात जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या नेतृत्वात मतदार संपर्क अभियान जिरेवाडी सर्कलमध्ये चालू असताना अनेक गावांमध्ये कॉर्नर मिटिंगा घेण्यात आल्या.त्यावेळी ते बोलत होते.मीटिंगमध्ये मतदारांशी संवाद साधताना मिलिंद घाडगे यांनी सांगितले की २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये आपण पद, पैसा, प्रतिष्ठा व सत्तेपासून वंचित उपेक्षित असलेल्या परिवर्तनवादी समाज बांधवांनी जो मतदानाच्या माध्यमातून राजकीय एकोपा दाखवून दिला होता. व वंचित बहुजन आघाडी हा तिसरा पर्याय मतदारांसमोर उभा केला. त्यामुळे अनेक प्रस्थापितांच्या पायाखालची वाळू घसरली होती. सेना, बीजेपी व कॉंग्रेस, राष्ट्रवादी या प्रस्थापित पक्षांच्या मनामध्ये धडकी भरली होती. एक प्रकारचा राजकीय दरारा निर्माण झाल्यामुळे सर्व सामान्यांच्या इच्छा अपेक्षा वंचित कडून वाढल्या होत्या

## नीतेश राणेच्या सभेवरविरोधकांचा विशिष्ट समाजांच्या आक्षेपा मुळे जुळ्या शहरातील वातावरण तणावपुर्ण

अचलपुर( अशोक वस्ताणि)

पास जिल्हयातिल १४०पोलिस अधिकारी व १२०० पोलिसांचाताफा तैनात सकल हिंदू समाजाच्या वतीने यूथचर कृषी उत्पत्बाजार समिती येथे रविवार,२९ सप्टेंबर रोजी आ. नीतेश राणेयांची धर्म जागरण सभा तसेच जुळया शहरात रोड शो होणारआहे. त्या विरुद्ध कंग्रेस, संभाजीब्रिगेड, मुस्लिम संघट्नांनी आक्षेपघेतत्याने जुळ्या शहरातिल वातावरण तापले आसीन तणावाचि स्थिति निर्माण झाल्याने शहरात ५जिल्ह्यांतील१४०पो, अधिकारी सह १२०० पोलिसदाखल झाले असून तणावपूर्णशांतता निर्माण झाली आहे.



आ. नीतेश राणे यांच्यादौ्याचा अनुषंगाने २८ सप्टेंबररोजी अचलपूर शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता. पोलिसविभागाकडून परतवाडा वअचलपूर शहरात रूट मार्चकाढण्यात आला. अचलपूरपोलिस ठाण्यात २८ सप्टेबर रोजीअमरावती विभागातील १ ३४अधिकारी, १२०० कर्मचारी,एसआरपीएफ व आरसीबीच्यातीन तुकड्या बंदोबस्तासाठीतैनात झात्याने रस्त्यावर पोलिसवाहनाची प्रचंड गर्दी होती.एकीकडेअमरावतीउपजिल्हाधिकारी कार्यलियाकडून दोहनी शहवात शांततेच्या दृष्टान्त विविध क्र् लागी केन्या आहेत पथसंचलन करताना पोलिसांचे पथसंचालनाने नागरिकामधे कमालिचि धस्ति निर्माण झालि आहे

प्रतिबंधात्मक आदेश पारित झाले आहेत. यामुळे नीतेश राणे यांचा२९ सप्टेंबर रोजी होणानर्या अचलपूर दौन्याबाबत संभ्रम निर्माण झाला होता परंतु शक्ति फाउंडेशन चा अब, ठाकुर प्रमोदसिंह ग्रैव यानी वायरस कैमेलिया विडाल मुळे(हिंदु सभा ठरलेल्या ठिकाना व ठरलेल्या वेळेवर होत्र म्हणजे होणारच व हिंदयोद्धा निवेश राजे येणारच) . शक्तीफाऊडेशनचे ॲड, प्रमोदसिंहगड़ेत यांनी आ. नीतेश राणेयांच्या प्रमुख उपस्थितीत २९सप्टेंबर रोजी सभा व दचाकी रैलीहोणार असत्याचे सांगितले.

# होम मिनिस्टर कार्यक्रमाने पवणसुत मंगलकार्यालय, महिलांच्या उत्साहाने फूलून गेले

बीड ।प्रतिनिधी

गेल्या १० दिवसापासून सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची लोकप्रियतेची महिलांमध्ये क्रेझ निर्माण झाली आहे. पैठणीची मानकरी मीच ठरणार पैठणी मीच जिंकणार या आत्मविश्वासाने आणि उत्साहाने महिला या कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होत आहेत. पवनसुत मंगल कार्यालय प्रभाग क्रमांक १२ आणि १३ या या ठिकाणी आज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या कार्यक्रमाची लोकप्रियता शिगेला पोहोचली आहे.हजारोच्या संख्येने महिला या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.या कार्यक्रमाचे उद्घाटन सौ.रेशमा अंबादास गुजर सरपंच मंजेरी , शिरूर पंचायत समितीच्या माजी सभापती सौ.योगिता सुधाकर मिसाळ,डॉ .सौ. उज्वला वनवे,सौ.गंगासागर तुपे सौ.सुरेखाताई जगताप, सौ.अर्चनाताई शिंदे, सौ. संगीताताई वनवे,सौ. संपदा संतोष भगणे,सौ.वैशाली सानप,सौ.राधाबाई खेडकर, सौ. सुलोचना उगलमुगले,सौ. सरिता सीरसाट,सौ.मीरा शंकर बारगजे,सौ.रजनी भास्करराव जोशी,सौ.उषा खेडकर,सौ सारिका सचिन जवकर,सौ.अश्विनी संतोष वन गुजरे,सौ.सविता काळे महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ.जयश्रीताई विधाते, माजी सभापती सौ.उषाताई सरवदे,सौ.प्रेमलताताई चांदणे,सौ.किर्तीताई पांगारकर साळुंके,सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर, सौ.अंजलीताई पांगारकर,सौ. स्मिताताई,सौ. सुशिलाताई नाईकवाडे,सौ. अनिताताई डोंगरे,सौ.श्रद्धा डुबलज व सौ. स्वाती सोमनाथ बारस्कर, सौ. माधुरी संतोष जवकर ,आदी मान्यवर महिलांच्या उपस्थितीत पार पडले.होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे १८ सप्टेंबर २०२४ ते ४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सुरू असलेल्या कार्यक्रमाने दिवसेंदिवस गर्दीचे उच्चांक मोडले आहेत,कालच्या कार्यक्रमापेक्षा



उद्याचा कार्यक्रम अधिक भरभच्च आणि लोकप्रिय होत आहे. याचे सर्व श्रेय काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर महिला आघाडी विचारमंच यांच्या सूत्रबद्ध नियोजनातून ही स्पर्धा दिवसेंदिवस लोकप्रियतेचे शिखर काबीज करीत आहे.

या कार्यक्रत भाग्यवान मानाच्या पैठणीची विजेती सौ. ज्योती सिद्धेश्वर गीते, द्वितीय इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी विजेत्या सौ.स्वाती दिनकर मिसाळ. तर तृतीय विजेत्या चौरंगाच्या मानकरी सौ.पल्लवी संदीप पाटील या ठरल्या आहेत.तर उर्वरित सात महिलांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.यामध्ये सौ.उषा एकनाथ काकडे, सौ.अनिता प्रवीण मिसाळ,सौ.सारिका राकेश पवार,सौ.अश्विनी सुरेश तांदळे,सौ.गीता प्रकाश ढाकणे,सौ.कविता अतुल पवार,सौ.राधिका आनिल घोरड या मानकरी ठरल्या कार्यक्रमात बक्षिसाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या सर्व महिलांची ७ ऑक्टोबर रोजी बीएच.एम.एस. कॉलेज येथे होणाऱ्या खेळ पैठणीचा महाराष्ट्रातील प्रसिद्ध क्रांती नाना माळेगावकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे,यासाठी सर्व महिलांची निवड झाली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचाचे सर्व नगरसेवक कार्यकर्ते यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.

## द्वितीय पुण्यस्मरण निमित्त भव्य दिव्य मोफत आरोग्य तपासणी कुपन वाटप शिबिराचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

येथील सुप्रसिद्ध सामाजिक नेतृत्व स्व. भगीरथ दादा बियाणी यांच्या द्वितीय पुण्यस्मरण निमित्त भव्य दिव्य मोफत आरोग्य तपासणी कुपन वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील दिनदुबळ्या आणि गरजू लोकांच्या मदतीला भगीरथ दादा बियाणी नेहमी धावून जात होते. त्यांनी त्यांचे आयुष्य वारकरी सेवा, आरोग्य सेवा, शैक्षणिक सेवा इत्यादी बाबींमध्ये सर्व सामान्य व्यक्तींनी मदत करण्यासाठी समर्पित केले होते. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांनी चालू केलेले समाज कार्य कोठेही थांबू नये यासाठी त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणारे त्यांचे सहकारी आणि बियाणी परिवार सदैव प्रयत्नशील असते.

भगीरथ दादा बियाणी यांच्या द्वितीय पुण्यस्मरण निमित्त बीड शहरातील ऑटो चालक आणि गरजू लोकांसाठी दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ वार रविवार रोजी भगीरथ बियाणी डिजिटल कोचिंगच्या प्रांगणात भव्य दिव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे या शिबिरात गरजुंना बीड शहरातील दहा सुप्रसिद्ध रुग्णालयाचे तपासणी पास मोफत देण्यात येणार आहे. यामुळे रुग्ण हॉस्पिटलला भेट देऊन चांगल्या प्रकारे आरोग्य तपासणी करू शकेल. तपासणी नंतर गरज भासल्यास रुग्णांना विविध शस्त्रक्रिया विविध शासकीय योजनेतून करण्यासाठी मदत देखील केली जाणार आहे. या शिबिरासाठी बीड शहरातील सिद्धिविनायक रुग्णालय, फिनिक्स रुग्णालय, संजीवनी रुग्णालय, रामकृष्ण मूळव्याध रुग्णालय, उन्हाळे हॉस्पिटल, बियाणी मल्टिस्पेशलिटी दंत क्लीनिक, एकदंत डेंटल क्लिनिक, उत्कर्ष डेंटल क्लिनिक, माऊली डेंटल क्लिनिक, श्री बाल रुग्णालय, जेथलिया हॉस्पिटल, वेदश्री आयुर्वेद चिकित्सालय या हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी आपली सेवा



उपलब्ध करून दिलेली आहे. तरी जास्तीत जास्त गरजू लोकांनी या शिबिराच्या मोफत पासेसचा लाभ घ्यावा अशी विनंती भगीरथ दादा बियाणी सामाजिक प्रतिष्ठान तर्फे करण्यात आलेली आहे. मोफत पासेस साठी नाव नोंदणी भगीरथ बियाणी डिजिटल कोचिंग, पवनसुत ऑइल इंडस्ट्री, आणि प्रवीण मेडिको येथे करता येईल. तसेच ८६००५५५६८९ / ९२२६५५८१९५ या क्रमांकावर संपर्क साधून देखील आपली मोफत नोंदणी करता येईल.

## आ. पंकजाताई मुंडेंनी जिल्हा ढवळून काढला ; सलग दोन दिवस पदाधिकाऱ्यांच्या मॅरेथॉन बैठकीत केली सविस्तर चर्चा

परळी ।प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या परळी मुक्कामात संपूर्ण जिल्हा ढवळून काढला. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी विविध मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या सलग दोन दिवस मॅरेथॉन बैठका घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

आगामी विधानसभा निवडणुकीचे वारे सध्या जोरात वाहू लागले आहे. त्या अनुषंगाने भाजप नेत्या आ. पंकजाताई मुंडे सध्या राज्यभर संघटनात्मक दौरे करत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच



झालेल्या मराठवाड्यातील कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीत त्या उपस्थित होत्या. याठिकाणी त्यांनी विविध भागातून आलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला होता. त्यानंतर लगेच दुसर्या दिवशी त्या थेट जिल्हयात दाखल झाल्या. परळी येथे निवासस्थानी त्यांनी सलग दोन दिवस आष्टी-पाटोदा-शिरुरकासार, केज, माजलगाव आणि परळी शहर व ग्रामीण मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांच्याशी सविस्तर अशी चर्चा केली. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने पक्षाला यश मिळवून देण्यासाठी सर्वांनी जोमाने व एकजूटीने कामाला लागण्याच्या सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

जनता दरबारात प्रश्न लावले मार्गी

विधानसभा मतदारसंघ निहाय बैठकांबरोबरच आ. पंकजाताई मुंडे यांनी जनता दरबार घेऊन जनतेच्या समस्यांचा जागेवरच निपटारा केला. जिल्हयातून तसेच राज्याच्या विविध भागातून अनेक नागरिक व कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन आपल्या समस्या त्यांच्या कानावर घातल्या. या सर्वांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांचे प्रश्न यावेळी आ. पंकजाताईंनी मार्गी लावले.

## १४ वर्षीय मुलांच्या पुण्यातील क्रिकेट सामन्यात शौर्य जाधव सामनावीर

पुणे ।प्रतिनिधी

पुणे येथील पुणा वेस्टर्न क्लब मैदानावर भारतीय पुर्व खेळाडू धीरज जाधव यांनी आयोजीत केलेल्या द पुणा वेस्टर्न १४ वर्षाखालील मुलांचे क्रिकेट सामने खेळवण्यात आले या स्पर्धेचे उद्घाटन आभिजीत जगताप, कैलास येवले यांच्या हस्ते करणयात आले या स्पर्धेत पुण्यासह मुंबईतील संघानी देखील सहभाग नोंदवला होता बीडचा शौर्य जाधव यांस पुण्यातील आजीत वाडेकर संघाने खेळण्यास संधी दिली यावेळी आज २०-२० षटकांचे दोन सामने खेळण्यात आले पहिला सामना अजीत वाडेकर संघ वि कोली क्रिकेट फाउंडेशन मुंबई यांच्यात सकाळच्या सत्रात पहिला सामना खेळण्यात आला यावेळी मुंबई संघाने २० षटकांत ६ बाद १६५ धावा केल्या याधावसंख्येचा पाठलाग करतांना वाडेकर संघाने १४.५ षटकांतच १६६ धावा करत सामना जिंकला यावेळी बीडच्या शौर्य ने उत्कृष्ट फलंदाजी करत केवळ २७ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह ३८ धावा करत धावबाद झाला व एक गडी बाद केला तर दुपरच्या सत्रात ब्रिलीयंट संघ विरुद्ध अजीत वाडेकर संघात सामना खेळला गेला यावेळी ब्रिलीयट संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ५ बाद १३६ धावा केल्या यानंतर वाडेकर संघाकडून ओपनिंग फलंदाजी साठी आलेल्या बीडच्या आदर्श क्लबचा शौर्य जाधव यांने फलंदाजी करतांना तिनं उत्तुंग षटकार खेचत आठ चौकारासह ५१ चेंडूत ६३ धावा करत सामना जिंकला याबद्दल शौर्य ला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी पुर्व भारतीय खेळाडू धीरज जाधव, अजीत वाडेकर संघाचे



सर्वेसर्वा राजू मुजावर, व ब्रिलीयंट संघाचे प्रशिक्षक नितीन सामल, व मुंबई संघाचे प्रशिक्षक सचिन कोळी, व शौर्यचे प्रशिक्षक अजहर शेख, संजय धस सरांनी शौर्यचे अभिनंदन केले.

## शिनगीरे आणि अरुण पडोळे यांचा जिल्हाधिकारी पाठक यांच्या हस्ते गौरव

### उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल चौथ्यांदा सन्मान

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील वटणवाडी सहकारी सेवा सोसायटीचे किरण शिनगीरे व सचिव अरुणजी पडोळे यांचा अविनाशजी पाठक जिल्हाधिकारी बीड, ठोंबरे मुख्य कार्यकारी अधिकारी बीड,समृद्ध जाधव जिल्हा उपनिबंधक बीड, अशोकरावजी कदम औसाचे सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था), या मान्यवरांच्या हस्ते २७ सप्टेंबर रोजी बँकेच्या ६९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमांमध्ये बीड येथे प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच या कार्यक्रमासाठी माजी आमदार रमेश आडसकर,माजी आमदार केशव आंधळे,राजाभाऊ मुंडे, गंगाधर आगे, बीड जिल्ह्यातील सर्व सहकारी सेवा सोसायटी चेअरमन व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिनगिरे यांच्यासोबत सहकारी सेवा सोसायटीचे सचिव अरुण पडोळे, जेष्ठ तपासणीस आष्टी तालुका शारदजी आजबे, सचिव महेश कोकणे, गणेशजी देशपांडे, हे उपस्थित होते. वटणवाडी सहकारी सेवा सोसायटीचा उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल चौथ्यांदा गौरव करण्यात आला.

## ॲड. शंकर चव्हाण यांना परळी मतदारसंघात जनतेचा फुल सपोर्ट

### ‘बदल हवा, आमदार नवा’ स्टेटसचा सोशल मिडीयावर धुमाकूळ

**प्रतिनिधी** । परळी

सध्या परळी मतदार संघात चर्चेत असेलेलं युवा नेतृत्व ड. शंकर चव्हाण यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु असल्याची पहावयास मिळत आहे. परळी मतदार संघातून निवडणुक लढणार असल्याबाबत सुरु असलेल्या चर्चेनंतर थेट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांच्या भेटीनंतर या चर्चेला एक वेगळंच वळण लागलं आहे. असे असतांनाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आपल्याला तिकीट मिळावे यासाठी ड. शंकर चव्हाण यांनी दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी खा. शरदचंद्र पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती. पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी सकारात्मक चर्चाही झाल्याचं ड शंकर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितलं होतं. खा. शरदचंद्र पवार हे यंदाच्या विधानसभेला नवीन चेहऱ्यांना संधी देतीलच असा आत्मविश्वास ड. शंकर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला आहे.

सध्या परळी मतदार संघातील जनतेकडून ड. शंकर चव्हाण यांच्याकडे स्वच्छ प्रतिमेचा माणूस म्हणून सकारात्मकतेनं पाहिलं जात आहे. प्रत्येक कृती व प्रत्येक पाऊल आता परळी मतदार संघाच्या विकासासाठीच असं सकारात्मक धोरण घेऊन ड शंकर चव्हाण यांनी परळी विधानसभा निवडणुक लढण्याचं मिशन हाती घेतलं असल्याचं पहावयास मिळत आहे. विकासाचा निर्धार व विजयाचा सकंल्प केल्याचाही उल्लेख सध्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनतेसमोर ड चव्हाण यांनी मांडला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पाहिल्यांदाच इतिहास घडणार आहे की, सर्व जातीधर्मातील जनतेला एकत्र घेऊन येणाऱ्या काळात जातीचं विष समाजामध्ये पेरणाऱ्यांना व तेढ निर्माण करणाऱ्यांना निवडणुकीतून पराजय स्विकारावा लागेल असा ठाम विश्वास ड. शंकर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला. यंदाची विधानसभा निवडणुक ही फक्त आणि फक्त विकासाच्या मुद्यांवरच होईल व निवडुण आल्यानंतरही इतरांप्रमाणे गुत्तेदार न पोसता व स्वत:ची घरं न भरता फक्त आणि फक्त विकासकामांनाच माझ्याकडे थारा असेल असंही मत ड. शंकर चव्हाण यांनी व्यक्त केलं आहे.



परळी मतदारसंघात अठरापगड जाती धर्माचे लोक आहेत, ही निवडणुक सर्वांना सोबत घेऊन कसल्याही प्रकारचा जातीवाद न करता, कोणताही पक्षपात न करता संबंध महाराष्ट्रात एकहाती सत्ता आणून अखंड महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलून टाकणार असल्याबाबतही माझं धोरण पुढील काळात असणार आहे असंही परखड मत माध्यमांशी बोलतांना ड. शंकर चव्हाण यांनी केलं आहे.

सध्या सोशल मिडीयावर व्हारल होत असलेल्या ड. शंकर चव्हाण यांच्या पोस्ट जोरदार चर्चेत आहेत. बदल हवा, चेहरा नवा, स्वच्छ प्रतिमेचा, माणूस कामाचा, सर्वसामान्यांच्या हक्काचा, नव्या पर्वाचा नवा शिलेदार, अबकी बार नया आमदार अशा विविध प्रकारच्या पोस्ट परळी मतदार संघातील जनतेच्या सोशल मिडीयावर स्टेस्टला पहावयास मिळत आहेत. इतकंच नव्हे तर तरुण वर्गातून ड. शंकर चव्हाण यांना परळी मतदारसंघात जनतेचा फुल सपोर्ट व ‘बदल हवा, आमदार नवा’ अशा स्टेटसचा तर सोशल मिडीयावर धुमाकूळ घातला आहे. सकारात्मक विचार व विकासात्मक धोरण असणारे ड. शंकर चव्हाण यांच्यासारखेच लोकप्रतिनिधी म्हणून परळी मतदारसंघाचा विकास करण्यासाठी सक्षमपणे असायला पाहिजेत आहे सुर परळी मतदार संघातील जनतेकडून ऐकायला मिळत आहे. यावरुन माझे विकाकामांबाबत मुद्दे स्पष्ट आहेत व जनता ही केव्हाही सत्याच्या बाजूने भक्कम उभी राहते त्यामुळे परळी विधानसभा मतदार संघाचा पुढचा आमदार मीच असणार आहे असा आत्मविश्वास ड. शंकर चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

परळी विधानसभा मतदार संघाचा पुढचा आमदार मीच

महाराष्ट्राच्या राजकारणात पाहिल्यांदाच इतिहास घडणार आहे की, सर्व जातीधर्मातील जनतेला एकत्र घेऊन येणाऱ्या काळात जातीचं विष समाजामध्ये पेरणाऱ्यांना व तेढ निर्माण करणाऱ्यांना निवडणुकीतून पराजय स्विकारावा लागेल .

## बीडचे आर.टी.ओ.कार्यालय स्थलांतराला सामान्यांचा विरोध

**प्रतिनिधी** । बीड

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बीड चे सध्या कार्यरत कार्यालय काहीही कारण नसताना काही आधिकारी च्या स्वार्थासाठी स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरु असून त्याला स्थगिती द्यावी व सदरचे कार्यालय बीड शहरात शासकीय जागेत स्थलांतर करण्याची मागणी मोटार ड्रायव्हिंग स्कूल चे संचालक, वाहन मालक चालक संघटनेचे पदाधिकारी व वाहन मालकांनी ॲड. बक्शु अमीर शेख यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देऊन केली आहे.

या बाबतीत सविस्तर माहिती अशी की उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बीड हे राष्ट्रीय महामार्गावर नामलगाव फाटा येथे प्रशस्त जागेत आर. सी. सी. बांधकामात सध्या कार्यरत आहे. या ठिकाणी हे कार्यालय साधारण दोन वर्षांपूर्वी काही विशेष कारण नसताना स्थलांतरित होउन आले. सध्या काही आधिकारी च्या स्वार्थापायी हे कार्यालय अहमदनगर रोड वरील म्हसोबा फाट्याच्या आत आडवळणी मार्गावर कच्च्या रस्त्यावर घेऊन जाण्याचा प्रयत्न होत असून त्याची प्रशासकीय मान्यता मिळवण्यासाठी खटाटोप सुरु आहे.

विशेष म्हणजे सध्या कार्यरत कार्यालय ही खासगी जागेत भाडेतत्त्वावर आहे. आणि जेथे नवीन जागेत जाणार आहे ती पण खासगी जागा असून भाडेतत्त्वावरच राहणार आहे. कळस म्हणजे बीड शहरात बर्याच शासकीय इमारती रिकाम्या असताना शहराच्या लांब भाड्याने हे कार्यालय का असते हे एक न सुटणार कोडे आहे.

मागे जिल्हाधिकारी बीड यांनी नामलगाव फाटा कुमशी रोडवर बरीच जमीन या कार्यालयासाठी नावे करुन दिलेली आहे. परंतु तेथे हक्काच्या शासकीय जागेत कायमस्वरूपी न जाता हे कार्यालय नेहमी भाड्याच्या



**हे कार्यालय शहरा पासून लांब, खाजगी जागेत का असते? हे न सुटणार कोड आहे.**

जागेत का जाते हे कळत नाही. शासकीय कार्यालय स्थलांतर ही खर्चिक बाब आहे. दोन वर्षांपूर्वीच स्थलांतरावर खर्च झालेला असताना पुन्हा तो भुर्दंड शासनाच्या तिजोरीवर का असा प्रश्न जनता विचारत आहे.

म्हणून दिनांक २२आगस्ट २०२४ रोजी मोटार ड्रायव्हिंग स्कूल चे संचालक, वाहन मालक चालक संघटनेचे पदाधिकारी व वाहन मालकांनी सामाजिक कार्यकर्ते ॲड. बक्शु अमीर शेख यांच्या नेतृत्वात सदरचे कार्यालय स्थलांतराला स्थगिती देण्याची व सदरचे कार्यालय बीड शहरात शासकीय जागेत स्थलांतर करण्याची मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या कडे निवेदन देऊन केली आहे. जेणे करून भाडे वाचून शासनाचे पैसे ही वाचतील व लोकांची गैरसोय ही दूर होईल.

# दलित जोडो अभियानातंर्गत पँथर सेनेचा केजमध्ये उद्या कार्यकर्ता संवाद मेळावा

## दिपक केदार करणार मार्गदर्शन ; तालुकाध्यक्ष समाधान बचुटे यांच्या संपर्क कार्यालयाचे होणार उद्घाटन

केज । प्रतिनिधी

ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांच्या आदेशाने राज्यभरात दलित जोडो अभियान कार्यक्रम घेण्यात येत आहेत. त्यातंर्गत केजमध्ये उद्या कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्याला दिपक केदार मार्गदर्शन करणार आहेत.तसेच याप्रसंगी पँथर सेनेचे केज तालुकाध्यक्ष समाधान बचुटे यांच्या संपर्क कार्यालयाचे केदार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास उपस्थित रहाण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

आजही दलित समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय-अत्याचाराच्या घटना घडत आहेत. या अन्याया विरोधात पँथर दलितांचा हुकार बनून पुढे आली. ही दलितांच्या मान-सन्मान- स्वाभिमानाची फुले-शाहु-आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणारी चळवळ असून ऑल इंडिया पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक केदार यांनी महाराष्ट्रातील तमाम दलित बांधवांच्या हक्क अधिकारांसाठी राज्यभरात दलित जोडो अभियानाला सुरवात केली. त्या अनुषंगाने सोमवारी (दि.३०) सकाळी ११ वाजता केज शहरातील केज-बीड रोडलगत कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला



असून या मेळाव्यास दिपक केदार मार्गदर्शन करणार आहेत.यावेळी विनोद भोळे, अशोक घडवे पाटील,जीवन गायवकवाड, अक्षय भुंबे,नितीन सोनवणे,मिनाताई लोंढे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.तसेच याप्रसंगी पँथरचे केज तालुकाध्यक्ष समाधान बचुटे यांच्या संपर्क कार्यालयाचे दिपक केदार यांच्या हस्ते थाटामाटात उद्घाटन केले जाणार आहे.तरी कार्यक्रमास दलित समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समाधान बचुटे यांनी केले आहे.





## सुचना

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ चे जातेगाव प्रतिनिधी गोपाल चव्हाण व चकलांबा प्रतिनिधी गफ्फर सय्यद यांना पदावरून कार्यमुक्त करण्यात आले असून जाहिरातदार, वाचकांनी तसेच प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गोपाल चव्हाण व गफ्फर सय्यद यांच्याशी कसलाही आर्थिक व्यवहार करू नये, आणि केल्यास दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालय याला जबाबदार राहणार नाही. तसेच दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या नावाखाली नागरिकांना व प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल केल्यास आणि ते निदर्शनास आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. लवकरच त्या ठिकाणी नवीन प्रतिनिधी नियुक्ती करण्यात येईल.

- व्यवस्थापक

# विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकनेत्या मा. खासदार स्व.सौ.काकूंच्या स्मृती दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न



बीड - आज विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकनेत्या माजी खासदार स्व.सौ.केशरबाई क्षीरसागर उर्फ काकूंच्या स्मृती दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.सदर स्पर्धा ५वी ते ७ वी छोटा गट तर ८वी ते १०वी मोठा गट अशी दोन गटात घेण्यात आली.दोन्हीही गटांसाठी प्रत्येक वर्गातील ३ स्पर्धकांचा संघ सहभागी होता.सर्व प्रथम लोकनेत्या स्व.सौ.काकूंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मा.मुख्याध्यापक श्री . जाधव एम.सी. सर यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. व विद्यार्थांना मोलाचे मार्गदर्शन केले....प्रत्येक गटासाठी तीन फेऱ्यामध्ये प्रश्नांची चिठ्ठी काढून प्रश्न विचारले गेले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी उपमुख्याध्यापक श्री. बेग सर पर्यवेक्षक श्री अमरापुरकर सर,प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आ.रोहित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिर

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

कर्जत जामखेड चे आमदार मा. रोहित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त किल्ले धारूर शहरात निवासी मतिमंद विद्यालयात महाआरोग्य शिबिर घेण्यात आले. त्यावेळी मतिमंद मुलांची व मुलींच्या आरोग्याची तपासणी करून त्यांना खाऊ वाटप करण्यात आला यावेळी उपस्थित ग्रामीण रुग्णालयाचे डॉ फरवेज शेख साहेब,डॉ अरविंद निक्ते साहेब,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक तालुका अध्यक्ष गणेश थोरात,निलेश ढगे,स्वप्नील धनवडे,तेजस चव्हाण,बाळू थोरात,सुधीर



गिरी,बाळासाहेब चौरे, शुभम चाळक,विकास तिकडे,विष्णू मैंद व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सामाजिक उपक्रम गणेश थोरात यांनी आयोजित केला होता.



# रिलायन्स फाउंडेशन कडून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे

तालखेड ।प्रतिनिधी

माजलगावं तालुक्यातील मालिपरगावं येथिल शाळेतील विद्यार्थीना स्वच्छतेचे महत्व सांगण्यात आले महाराष्ट्रामध्ये १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छ्ता पंधरवडा म्हणून साजरा करतात या अनुषंगाने माजलगाव तालुक्यातील माली पारगाव कॅम्प येथे राजमाता जिजाऊ पब्लिक स्कूल येथे रिलायन्स फाउंडेशन कडून स्वच्छ्ता ही सेवा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमामध्ये शाळेतील मुलांना स्वाछतेची शपथ देण्यात आली आणि शाळेमधला परसर स्वच्छ करून मुलांना खाऊ वाटप करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महिला आणि बाल विकास विभाग अंगणवाडी सेविका निता करंजकर(दुबे) यांनी मुलांना स्वच्छ्ता विषयी माहिती दिली आणि त्यांना बाल गीतांमधून स्वछतेचे महत्त्व पटऊन दिले या कार्यक्रमाला कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे प्राचार्य श्री . घाटूळ. बी. ए सर, तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. घाटूळ. ए. बी सरांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घाटूळ मॅडम यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. थावरे मॅडम यांनी केले.होते तसचे या कार्यक्रमाचे आयोजन रिलायन्स फाउंडेशन चे जिल्हा प्रतिनिधी विजय खंडागळे आणि क्लस्टर मॅनेजर तज्जोदिन काझी यांनी केले होते

# भारतभूषण क्षीरसागरांनी गणेश मंडळांना कायम पाठबळ दिले-डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये रा.काँ. पक्ष, कल्पतरू आयोजित गणेश मंडळ देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण

बीड (प्रतिनिधी)

गणेशोत्सवात बाल-थोरांचा सहभाग असतो. यावर्षी बीडच्या गणेशोत्सवात प्रचंड उत्साह दिसून आला. खंडीत झालेली देखाव्यांची परंपरा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी गणेशोत्सवात गणेश मंडळांना कायम पाठबळ दिले. पुढील वर्षी त्यांच्या संकल्पनेतील गणेशोत्सव सोहळा घेतला जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व बीड कल्पतरू आयोजित सार्वजनिक गणेश मंडळ देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण शनिवारी (दि.२८) पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, माजी नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, शुभम धूत, प्रेम चांदणे, राष्ट्रवादी लिगल सेलचे ड.गणेश तांबारे, सरपंच अमोल बागलाने, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, ईश्वर धनवे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, आमचे ग्रामदैवत नवगण राजुरीच्या गणपतीचा क्षीरसागर कुटुंबाला आशीर्वाद लाभलेला आहे. डॉ.भारतभूषण क्षीरसागर हे स्वतः सहभागी होऊन गणेशोत्सव साजरा करत. यावर्षी अमृतकाका सारडा यांच्या सूचनेनुसार देखाव्यांच्या स्पर्धा घेतल्या. पुढीलवर्षी बक्षिसांची रक्कम, देखाव्यांचे स्वरूप, सोहळ्याची व्याप्ती वाढविली जाईल, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उत्कृष्ट देखावा निवड समितीचे प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, व्यंकटेश वैष्णव, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर या परीक्षकांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.संजय पाटील देवळाणकर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार फामजी पारीख यांनी मानले. यावेळी अनेक गणेश मंडळांचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १ लाखांचे प्रथम, ५० हजारांचे द्वितीय तर ३० हजारांचे तृतीय बक्षीस देऊन सन्मान

बालाजी मंदिराची प्रतिकृती साकारणाऱ्या न्यू गणेश मंडळास १ लक्ष रुपयांचे प्रथम बक्षीस देण्यात आले. बद्रीनाथ धामची प्रतिकृती साकारणारे



## बालाजी मंदिराची प्रतिकृती साकारणाऱ्या न्यू गणेश मंडळास १ लक्ष रुपयांचे बक्षीस

मनोकामना गणेश मंडळ, उज्जैन महाकालची प्रतिकृती साकारणारे वीरशैव गणेश मंडळास द्वितीय क्रमांकाचे प्रत्येकी २५ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. तृतीय पारितोषिक आझाद हिंद गणेश मंडळ, छत्रपती जाणता राजा गणेश मंडळास प्रत्येकी १५ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. तसेच, दत्तात्रय गणेश मंडळ, राष्ट्रीय गणेश मंडळ, नवरंग गणेश मंडळ, ओझार गणेश मंडळ, महाराणा प्रताप गणेश मंडळ, पुरणदास गणेश मंडळ, समर्थ गणेश मंडळास उत्तेजनार्थ बक्षीस दिले. मंडळाच्या सदस्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व ट्रॉफी देऊन सन्मानित केले. बक्षीस वितरणानंतर सर्वच गणेश मंडळाच्या सदस्यांनी ढोल -ताशाच्या तालावर ठेका धरत जल्लोष केला.

### गणेश मंडळाचा सन्मान झाल्याचा आनंद -डॉ.सारिकाताई क्षीरसागर

डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या की, गणेशोत्सवात उत्कृष्ट देखावे साकारणाऱ्या मंडळांचा सन्मान करण्याची डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांची परंपरा आहे. त्यांचा आदर्श घेऊन दरवर्षी स्पर्धा घेतली जाईल. पेठ बीड भागात अमृतकाका सारडा यांच्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारण्यात आले. त्यांच्या संकल्पनेला गणेश मंडळांनी साथ दिली. पुढील वर्षी मोठ्या प्रमाणावर गणेश मंडळांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन करून गणेश मंडळांचा सन्मान झाल्याचा आनंद वाटतो, असे डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या.

# मंडळ विभाग राजुरी नवगण येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बुधवार दि. २५ रोजी राजुरी नवगन मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे कर्तव्यदक्ष तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली . जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला .राजुरी मंडळात राजूरी (न) , काटवटवाडी , वंजारवडी , तिप्पटवाडी , बेलूर , अव्वलपुर , तळेगाव , काकडहिरा , मुर्शदपुर (लि) , लिंबा रुई , रूई लिंबा , शहाजानपुर (ली) या गावांचा समावेश होतो . सदर बैठकीस राजूरी नवगन मंडळातील नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी , कृषी सहाय्यक , ग्रामसेवक , बीएलओ , पर्यवेक्षक , स्वस्त धान्य दुकानदार आदी उपस्थित होते . सर्वप्रथम तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे राजुरी (न) मंडळ अधिकारी प्रभू येवले व गावकरी यांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले . बीडचे उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी सांगत असतात की तहसीलदार यांनी प्रत्यक्ष गावकऱ्यांशी चर्चा करून अडचणी सोडवल्या पाहिजेत . त्यानुसार तहसीलदार शेळके यांनी बैठकीच्या सुरुवातीस मंडळातील उपस्थित शेतकरी सर्वसामान्य लोकांच्या अडीअडचणी विचारल्या व ऐकून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सूचना दिल्या . गावामध्ये तहसीलदार यांनी येऊन स्वतः अडचणी ऐकून घेतल्या व निराकरण करण्याचा प्रयत्न केला म्हणून गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले .

त्यानंतर उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार हजर असलेल्या बी एल ओ व त्यांचे पर्यवेक्षक यांचा आगामी निवडणुकीबाबतचा सविस्तर आढावा घेतला . राजुरी (न) मंडळातील एकूण तीन बी एल ओ व उपस्थित होते . या वेळी बीएलओ यांना मतदान केंद्र सुस्थितीत असले बाबत विचारणा केली असता सर्व बीएलओ यांनी मतदान केंद्र सुस्थितीत असल्याचे सांगितले . तसेच मतदान केंद्रावर वीज , पाणी व बाथरूम यांची व्यवस्था असले बाबत विचारणा केली असता सर्व बीएलओ यांनी लाईट , पाणी व बाथरूम यांची व्यवस्था असलेबाबत सांगितले .

त्यानंतर कृषी विभागातील कृषी सहाय्यक यांचेकडून अतिवृष्टी झाल्याने झालेल्या नुकसानीचे पंचनामे झाले असल्याची खात्री केली . फळबाग , शेततळे , पोकरा योजनेबाबत सविस्तर चर्चा केली . अतिवृष्टीबाबतचे पंचनामे करणे , अ ब क ड या नमुन्यांमध्ये तलाठी व ग्रामसेवक यांनी मिळून वेळोवेळी संयुक्त अहवाल दाखल करणेबाबत सूचना दिल्या . कृषी विभागाच्या सर्व शेतकऱ्यांपर्यंत योजना लवकरात



लवकर पोहोचवाव्यात , पारदर्शकपणे शेतकऱ्यांची कामे करावी अशा सूचना तहसीलदार यांनी दिल्या . त्यानंतर उपस्थित ग्रामसेवक यांच्या कामकाजाचा आढावा तहसीलदार शेळके यांनी घेतला . निवडणुकीच्या अनुषंगाने जबाबदाऱ्या पार पाडण्याबाबत सूचना तहसीलदार शेळके यांनी दिल्या . राजुरी (न) मंडळातील समाविष्ट गावातील लोकांनी पांदण रस्त्याबाबत प्रश्न मांडले . त्यावर ग्रामसेवक यांना पांदण रस्त्याबाबत सूचना दिल्या व मतदान केंद्राची स्थिती जाणून घेऊन त्यावर उपाययोजना कराव्यात , अशा सूचना दिल्या .

त्यानंतर पुरवठ्याचे उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला . सदर बैठकीच्या वेळी पुढीलप्रमाणे स्वस्त धान्य दुकानदार हजर होते . भोस्कर आर. बी.रुई लिंबा , भवर ए. डी. भेलुरा , सोनवणे विकास शहाजांपुर(ली) , तांदळे शहादेव निवृती वंजारवाडी , गणेश भालेराव लिंबा रुई . सदर रेशन दुकानदार यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला . एकही पात्र लाभार्थी रेशन मिळण्यापासून वंचित राहू नये अशा सक्त सूचना स्वस्त धान्य दुकानदार यांना शेळके यांनी दिल्या .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या नेहमी शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी सजग असतात . त्यांच्या सूचनेनुसार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याशी गावागावातील सर्व प्रश्नावर चर्चा केली . यामध्ये प्रामुख्याने अनुदानापासून कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये अशा सूचना त्यांनी केल्या . तसेच राहिलेल्या शेतकऱ्यांची इकेवायसी करून घ्यावी व ई पीक पाहणी लवकरात लवकर करावी असेही आवाहन केले . सलोखा योजनेचा प्रचार प्रसिद्धीकरणावर भर द्यावा , असे यावेळी तहसीलदार यांनी सर्व तलाठी यांना सांगितले . मंडळ अधिकारी व तलाठी यांना सूचना करताना तहसीलदार शेळके यांनी आवर्जून सांगितले की नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही पात्र फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये . सर्व गट जुळवण्यात यावेत असेही स्पष्ट केले . नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे , असे सुचविले . बैठक संपल्यानंतर तहसीलदार शेळके यांनी राजुरी (न) येथील मतदान केंद्राची पाहणी केली . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंडळ विभागात स्वतः येऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना केल्या . बैठकीसाठी राजुरीचे मंडळ अधिकारी प्रभू येवले , तलाठी संजय पाखरे राजुरी , तलाठी नवनाथ तांदळे मूर्शदपुर(ली) , तलाठी एम. एल. वनवे तळेगाव , तलाठी कुलकर्णी बेलूरा तसेच मंडळातील कृषी अधिकारी , कृषी सहाय्यक गावडे , कृषी सहाय्यक टिळेकर , मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बी.एल.ओ. ससाणे, बी.एल.ओ. जगताप , ग्रामसेवक घोडके आर. पी. , लांडगे एस. बी. , इंगळे वी. के. , आढाव एस. बी , मिसाळ एस. आर. , गिरी एस. एन.राऊत , लांडे डी. सी. व पोलीस पाटील तुकाराम ढवळे , बबन पवार तसेच रेशन दुकानदार उपस्थित होते .

यावेळी सरपंच मंजूषा बनकर, उपसरपंच भगवान बहिर व ग्रामपंचायत सदस्य आदी उपस्थित होते . बैठकीची प्रस्तावना मंडळ अधिकारी प्रभू येवले व सूत्रसंचालन नितीन गायकवाड यांनी केले . बैठक संपन्न झाल्यावर उपस्थित नागरिकांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना नमूद केले की अशाप्रकारे तहसीलदार यांनी स्वतः गावात येऊन सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांची बैठक घेण्याची व प्रश्न मार्गी लावण्याची ही पहिलीच वेळ आहे . अशा प्रकारे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी जनतेचे कामे केल्यास जनतेला निश्चितच दिलासा मिळेल असे म्हणून समाधान व्यक्त केले .

# आमदारकीचं सोनं करणे हेच माझे ध्येय ,बाळासाहेब आजबे

आष्टी ।प्रतिनिधी

आज पर्यंत तालुक्यात विविध विकास कामासाठी निधी आणून ते काम केले आहेत जनतेच्या विकासासाठी मी अहोरात्र प्रयत्न करत असून मी आज पर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याचा रुपया खाल्ला नाही त्यामुळे माझ्याकडे कुणाची बोट करायची ताकद नसल्याचे प्रतिपादन आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी घाटा पिंपरी येथे व्यक्त केले ते घाटा पिंपरी येथे दहा लक्ष रुपयांच्या सभामंडपाची उद्घाटन प्रसंगी बोलत होते ते पुढे बोलताना म्हणाले की दीडशे गावात दहा लक्ष रुपयांचे सभामंडप टाकले आहेत राहिलेल्या गावात दहा लक्ष रुपयाच्या सभामंडप टाकण्यात येतील गावात त्यात कार्य झाले पाहिजे म्हणून मी हा निर्णय घेतला आहे ज्या लोकांची अडचणी आहेत त्या सोडवण्याचा प्रयत्न मी सतत करत आहे गावाची गरज काय आहे ते मी पाहतो देवळाली ते सीना नदीपर्यंत पाणी साचले पाहिजे त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला



पाहिजे त्यासाठी नदी खोलीकरण व संरक्षण भिंत गरजेचे आहे दादेगाव सब स्टेशन मंजूर असून नऊ सबस्टेशन मंजूर केले आहेत त्यात एकूण ५६८ डीपी मंजूर केले मी जे मंजूर झाले मी खोटे आश्वासन देत नाही याच्या आधी बंधारे का झाले नाहीत असा अहवाल हे त्यांनी विरोधकाचे नाव न घेता उपस्थित केला राहिलेल्या दोन वर्षात दोन हजार कोटीचा निधी आणणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हरिभक्त परायण बबन महाराज घुमरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी नाकाडे देवळालीचे सरपंच शेकडे पोपट , सरपंच विठ्ठल नागरगोजे ,प्पपु गवळी बबनराव राझणे दिलीप तांदळे फसले मेजर हरिभाऊ दहातोंडे परशुराम मराठे सह गावातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अंकुश तळेकर यांनी केले

घाटा येथील गावात आमदार बाळासाहेब आजबे यांनी लाखो रुपयांचा निधी दिला परंतु त्यांना आजपर्यंत मातंग समाजातील स्मशानभूमीचा विसर पडला निवडणुका आले की मतासाठी येतात मग आता तुम्हाला विसर कसं काय पडतो असा प्रश्न दलित चळवळीतील कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे आमदार आजबे यांना कोरोनाच्या काळात देवळाली येथील बंधारा उद्घाटन प्रसंगी जनहित लोकशाही पार्टी जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे यांनी मशानभूमीच्या मागणी चे निवेदनाद्वारे मागणी केली होती परंतु त्या पत्रालाही केराची टोपली आज यांच्याकडून भेटली जनहीत लोकशाही पार्टी बीड जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे यांनी शिवाचा मळा येथे बंधाऱ्याचे उद्घाटन प्रसंगी लेखी निवेदन ही स्मशानभूमीसाठी मागणी केली होती परंतु सर्व आजी-माजी आमदार असं सर्वांनाच दलित वस्तीतील कामाचा विसर पडला आहे

# द्या कोणीही मदतीची हाक, तिथे मिळेल समीर शेखची साथ.!!

आष्टी ।प्रतिनिधी

**सामाजिक,राजकीय, पत्रकारिता जीवनात वावरताना असताना कायम लोकांसाठी मदतीला धावून जात अहोरात्र उपलब्ध असणार सांगवी परिसरातील समाजभिमुख सामाजिक एकोपा जपणार, सण उत्सव आदित सहभाग नोंदवणार, सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखात स्वतःला वाहून घेणार एक दिलखुलास व्यक्तिमत्व म्हणजे समीर शेख.**

**नुकताच त्यांनी मदत केलेला प्रसंग असा की, आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे रात्री २:३० वाजता श्रीकांत नवसुपे पुंडी यांनी त्यांना कॉल केला आणि म्हणले लातूर वरून नर्सरी झाडे घेऊन येत असताना डिझेल संपल्यामुळे सांगवी पाटण येथील राजमुद्रा हॉटेल जवळ गाडी बंद पडली.. अशी माहिती मिळताच त्यांनी कुठलाही विचार न करता ताबडतोब होकार देत, गांभीर्य लक्षात घेऊन.. त्यांनी मध्य रात्री स्वतःची मोटरसायकलवर जोडीदार येण्याची वाट न पाहता धामणगाव येथे जाऊन त्यांना डिझेल आणून देत गाडी चालू करून दिली.**

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांच्या या मदतीचे सामाजिक स्तरातून. ते नेहमीच अडचणीच्या काळात सर्वांना मदतीला धावून जात असतात त्यांच्या मदतीने अनेक शेतकरी असतील रस्त्या अपघातातील प्रवासी असतील तालुकास्तरावर विविध प्रशासकीय कामानिमित्त आलेले सर्वसामान्य नागरिक असतील या सर्वांना कायमच त्यांच्या कार्याच्या माध्यमातून दिलासा मिळत असतो.

गरजूंना मदत केल्यानंतर त्यानां तर मदत व न्याय मिळतोच त्या सोबत स्वतः ही एक आत्मिक समाधान मिळतं असं म्हणतात. मध्यरात्री वाटसरू गाडी प्रवासी ड्रायव्हर गणेश तपसे व भाऊसाहेब पाटील यांनी सांगितले आम्ही नवीन असल्यामुळे भीती वाटत होती. अशा कठीण प्रसंगी त्यांनी सामाजिक कार्यकर्ते समीर शेख धावून आल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत त्यांचे आभार मानले.

# आचारसंहिता लागू होण्यापूर्वी पोलीस शिपाई भरती सुरू करा - ॲड.आदर्श जाधव

आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याअगोदर राज्य शासनाने पोलीस शिपाई भरती प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी ड.आदर्श जाधव (महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना चे मराठवाडा अध्यक्ष यू.आ.) यांचा वतीने करण्यात आली. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यापूर्वीच राज्य शासनाने पोलीस भरतीची जाहिरात काढून अर्ज भरून घ्यावेत. तसेच ३ मार्च २०२३ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत दोन वर्ष कमाल वयोमर्यादा वाढवून देण्यात

आली आहे. त्या अनुषंगाने पोलीस विभागातील शिपायांची रिक्तपदे २० हजारापेक्षा अधिक आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने तातडीने पोलीस शिपाई भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी मा.राहुल दुबाले(सं.अध्यक्ष महाराष्ट्र पोलीस बॉईज



संघटना तथा महाराष्ट्र राज्य शासन गृह विभाग निराकरण समन्वय समिती सदस्य)यांचा मार्गदर्शनाखाली ड.आदर्श जाधव यांनी केली आहे.

# अशोक डक यांचे हजारो कार्यकर्त्यांसह मित्र परिसंवाद मेळाव्यातून भव्य शक्ती प्रदर्शन

## माजलगाव विधानसभा निवडणूक लढविणार

माजलगाव /प्रतिनिधी

राज्यात आगामी विधानसभा निवडणुकां लवकरच घोषित होणार असून प्रत्यक्षात अवघे काही तास आचारसंहितेच्या माध्यमातून दिसून येणार आहेत. जिल्ह्यामध्ये अनेकजण गुडघ्याला बाशिंग बांधून निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. माजलगाव मतदारसंघातून अशोक आबा डक मित्र परिसंवाद मेळाव्यातून अशोक डक यांनी हजारो कार्यकर्त्यांसह मित्र परिसंवाद मेळाव्यातून भव्य शक्ती प्रदर्शन करत माजलगाव विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. जिल्ह्यातील सह विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक असलेले जेष्ठ, कनिष्ठ नेते, पदाधिकारी निवडणूक लढविण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून उभे ठाकले आहेत. राज्य पातळीवर



महाविकास आघाडी तसेच महायुती यांच्यामध्ये जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटला नाही. कोणती जागा कोणत्या पक्षासाठी सुटणार आहे. याचे खलबते सुरू असतानाच माजलगाव मतदारसंघात अशोक डक यांनी मित्र परिसंवाद मेळाव्यातून विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून

आपल्या मित्र परिवाराशी चर्चा करून ही निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र पक्षाने तिकीट दिले नाही तर अशोक डक माजलगाव मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवितील का? याकडेही माजलगाव मतदारसंघातील जनतेचे लक्ष वेधले आहे. राज्य पातळीवरील नेत्यांच्या गुप्त बैठका झाल्याचे या परिसंवाद मेळाव्याच्या ठिकाणी बोलले जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडी, महायुती अशोक डकांकडे कोणत्या नजरेने पाहते आणि त्यासाठी काय रणनिती आखली जाते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# अलहूदा उर्दू हायस्कूल मध्ये शेख इरशान जावेदचा सत्कार

## मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

बीड ।प्रतिनिधी

शहरातील नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी बीड द्वारा संचलित अलहूदा उर्दू हायस्कूल येथून दहावी (एसएससी बोर्ड) परिक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेला विद्यार्थी शेख इरशान जावेद याने शालेय व आधुनिक शिक्षणावर परिणाम होऊ न देता पवित्र कुरआन मजीद मुखपाठ (हिफ़्ज़) केले. या निमित्ताने शाळेच्या वतीने विद्यार्थी शेख इरशान जावेद याचा शाळेकडून सत्कार करण्यात आला व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांचा ही शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना एस.एम.युसूफ़ म्हणाले की, आपल्याला जितके अधिक ज्ञान मिळते तितके आपण जीवनात अधिक वाढतो, विकसित होतो. सुशिक्षित असण्याचा अर्थ केवळ मान्यताप्राप्त आणि प्रतिष्ठित संस्था किंवा संस्थांकडून प्रमाणपत्रे आणि चांगला पगार मिळवणे असा होत नाही. तर याचा अर्थ जीवनात एक चांगला आणि सामाजिक व्यक्ती होणे देखील आहे. चांगले शिक्षण घेऊन चांगला नागरिक बनणे आणि




नंतर वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होणे गरजेचे आहे. चांगल्या शिक्षणाशिवाय आपण अपूर्ण आहोत. शिक्षण आपल्याला योग्य विचार करणारे आणि योग्य निर्णय घेणारे बनवते. अशा स्पर्धात्मक जगात अन्न, वस्त्र, निवारा यासह शिक्षण ही मानवाची गरज बनली आहे. दहावी हा भावी करिअरचा पाया असल्याने बऱ्याच वेळा अपुऱ्या माहितीमुळे पालक आपल्या पाल्यासाठी कोणते करिअर योग्य आहे, याबाबत साशंक असतात. दहावीनंतर मेडिकल व इंजिनिअरिंग व्यतिरिक्त उपलब्ध असणारे करिअरचे इतर पर्याय, विद्यार्थ्यांचा कल पाहून योग्य पर्यायांची निवड कशी करावी, दहावीनंतर होणाऱ्या विविध प्रवेश परीक्षा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित शिक्षण संस्था व त्यांची तयारी कशी करावी, याविषयी सखोल माहिती घेणे गरजेचे आहे असे म्हटले.

यावेळी मुख्याध्यापक डॉ. सिराज खान आरजु , सहशिक्षक मुहम्मद रफिक, शेख मोईजोद्दीन, शिक्षकेत्तर कर्मचारी शेख रफिक, मक्सूद तांबोळी, युनूस खान, शाळेचे विद्यार्थी आणि इरशान चे वडील शेख जावेद उपस्थित होते.

# कापुस - सोयाबीन अनुदानास सरकारकडून तारीख पे तारीख; शेतकरी हतबल

गेवराई तालुक्यातील एक लाखाहून अधिक शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत!


गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : पावसाअभावी शेतक-यांचे नगदी कपाशी,सोयाबीनचे उत्पन्न कमालीने घटले.शिवाय दर ही समाधान कारक मिळाला नाही.यामुळेच सरकारने या दोन्ही पिकाला प्रती हेक्टर पाच हजार रुपयाचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा केली.मात्र, घोषणा करुन देखील मोठा कालावधी झाला तरी अनुदानास शासनाकडून'तारीख पे तारीख'सुरु केल्याने गेवराई तालुक्यातील साधारण एक लाखाहून अधिक शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत. शेतक-यांना आर्थिक हातभार लावत असलेली गतवर्षी कपाशी,सोयाबीन पिकाच्या उत्पादनावर पावसाअभावी मोठा परिणाम झाला. त्यातच सोयाबीनचे ४ हजार २०० तर कापसाचे ६ हजार ८०० ते ७ हजार २०० च्या पुढे दर सरकलेच नाही.मात्र, शेतक-यांच्या घरातील कापुस विक्री होताच भावात थोडी सुधारणा झाली.

उत्पन्नाचा खर्च अधिकचा झाला असताना या दोन्ही पिकाचे उत्पन्न खर्चाइतपत पदरात पडले नाही.यामुळे

### ई-केवायसीचे ४० हजार शेतकरी प्रलंबित?

अर्थसहाय्यासाठी आधार पडताळणी(ई-केवायसी)करणे बंधनकारक करण्यात आले असून,गेवराईतील अर्थसहाय्यास पात्र १ लाख ४००० शेतक-यापैकी साधारण ४० हजार शेतक-यांची ई-केवायसी बाकी असल्याने अर्थसहाय्यास आडकाठी येणार आहे.



शेतक-यांचे आर्थिक नुकसान झाले होते.यामुळे विरोधकांकडुन शेतक-यास अर्थसहाय्य देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती.राज्य शासनाकडून मागणी मान्य करुन सोयाबीन व कापुस या दोन्ही पिकाला प्रती हेक्टरी पाच हजार रुपयाचे अर्थसहाय्य देण्यात येईल अशी घोषणा करुन सदरील मदत दोन हेक्टर पर्यंतची मर्यादा ठेवण्यात आली.परंतू निर्णय होऊन दोन महिन्याचा कालावधी लोटला तरी आद्याप ही गेवराई तालुक्यातील शेतक-यास कापुस सोयाबीनचे अर्थसहाय्य मिळाले नाही.

दरम्यान,प्रारंभी ऑगस्टच्या २१ तारखेला जमा होईल असे जाहीर केले असता अर्थसहाय्य शेतक-यास देण्यात आले नाही.त्यानंतर ता १० सप्टेंबर अर्थसहाय्य बॅक खात्यावर वर्ग करण्यात येणार अशी घोषणा केली. आता सप्टेंबरच्या २८ तारखेला अर्थसहाय्य वितरीत करण्यात येणार असले तरी आद्याप तरी शासनाकडून अधिकृत निर्णय आलेला नाही.परिणामी गेवराई तालुक्यातील जवळपास १ लाख ४००० शेतकरी अनुदानास'तारीख पे तारीख'येत असल्याने मेटाकुटीस आले आहेत.

# विश्व हॉस्पिटलमध्ये आठ दिवसीय मनका विकार शिबिर

## कमी दरात होणाऱ्या उपचार, मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा.डॉ विशाल पिंगळकर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ विशाल पिंगळकर यांच्या विश्व हॉस्पिटल बीड येथे जिल्ह्यातील सर्व रुग्णांसाठी २९ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर.. पर्यंत मनका विकारावर सल्ला आणि मार्गदर्शन उपचार अत्यंत कमी दरात होणार आहेत या स्पाइन वीक मध्ये डॉक्टरांचा सल्ला,एम आर आय होल स्पाईन स्क्रीनिंग,होणार आहे. रुग्ण इतर वेळी आल्याच्या खूप खर्च होतो पण रुग्णांच्या समाधानाकरिता विश्व स्पाईन हेल्थ सप्ताह दरम्यान रुग्णांकरिता अत्यंत माफक दरात सर्व रक्ताच्या तपासण्या, एमआरआय, फिजिओथेरपी मार्गदर्शन,आणि डॉक्टरांचा सल्ला हे होणार आहे. मनका घसरणे, नसा चोकअप होणे, मणक्याची गादी घसरणे,मनक्यात गॅप असणे, पाठ दुखणे,मान दुखणे, हातापायांना मुंग्या येणे बधीरपणा असणे, पायाचे पाठीशी दुखणे, हातापायाची संवेदन शक्ती कमी होणे,मणक्याचे अपघात,मज्जा तंतू मधील गाठी, स्पायनल ट्युमर इत्यादी विकाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांनी या मनका विकार शिबिराचा घ्यावा शिबिरामध्ये बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर हे मार्गदर्शन आणि उपचार करणार आहेत. ही सवलत मध्ये उपचार फक्त आठवडाभरासाठी राहणार असून.. जास्तीत जास्त रुग्णांनी या आठवडाभराच्या मनका विकार शिबिराचा लाभ घ्यावा संपर्क ०२४४२-२९५१५१ ८२०८९५२४४२ संपर्क करून नाव नोंदणी करून घ्यावी असे आवाहन



विश्व न्यूरो स्पाईन सुपर सर्जिकल हॉस्पिटल आणि रिहॅबिटेशन सेंटरच्या वतीने डॉ विशाल पिंगळकर यांनी केले आहे



# विवेकानंद विद्यालयातील विद्यार्थ्यांचे परळी तालुका क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश

परळी ।प्रतिनिधी

तालुक्यातील विवेकानंद विद्यालय पिंपळगाव गाढे येथील विद्यार्थ्यांनी परळी वैजनाथ तालुका क्रीडा स्पर्धेमध्ये गोळा फेक प्रकारांमध्ये सुरज नवले प्रथम तर शंतनू कराड दुसरा तसेच थाळीफेक या प्रकारांमध्ये वैभव पुरी हा प्रथम आलेला आहे याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सोनवणे सर ,श्री. स्वामी सर ,श्री उपाडे सर ,श्रीमती काजळे मॅडम तसेच कांबळे, राडकर ,घोडके सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यालयाच्या वतीने सर्व संघाचे अभिनंदन केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT